**कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानासाठी अनुज्ञप्ति शुल्काची वसुली.**

## महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक घभाव. १४८९/४०/सेवा-५

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० डिसेंबर १९९१

पहा : (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर. १२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९८८.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सीपीओ. १४७८/सीआर-३२७/सेवा-५, दिनांक १७ एप्रिल १९७८.

(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक घभाव. १०८९/४६/सेवा-५, दिनांक २३ मार्च १९८९.

## शासन निर्णय

मुंबई नागरी सेवा नियम, १९५९, खंड १ मधील नियम ८४९ (बी) च्या तरतुदीनुसार कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानासाठी, शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या वित्तलब्धीच्या १० टक्के किंवा निवासस्थानाचे प्रमाणित भाडे ह्यापैकी जे कमी असेल तेवढे अनुज्ञप्ति शुल्क (Licence Fee) द्यावे लागते. दिनांक १ जानेवारी १९८६ पासून वेतनश्रेणीमध्ये केलेल्या सुधारणा लक्षात घेऊन शासकीय निवासस्थानाच्या अनुज्ञप्ति शुल्काच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता. सर्व बाबींचा काळजीपूर्वक विचार करून शासन असा आदेश देत आहे की, शासकीय निवासस्थानासाठी अनुज्ञप्ति शुल्क (Licence Fee) ठराविक दराने आकारले जावे. त्यानुसार शासनाने कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यस्थानी पुरविलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या शासकीय निवासस्थानांसाठीचे अनुज्ञप्ति शुल्काचे (Licence Fee) दर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असतील व ते सर्व राज्यभर एकरूपतेनेच लागू असतील. संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनानुरूप निवासस्थानाच्या पात्रतेचा विचार न करता प्रत्यक्षात ताब्यात असलेल्या निवासस्थानाच्या प्रकारासाठी अनुज्ञप्ति शुल्काची वसुली केली जाईल.

**तक्ता**

| अनुक्रमांक | वेतनमर्यादा | अनुज्ञेय निवासस्थानाचा प्रकार | अनुज्ञेय चटई क्षेत्र (चौ. फूट) | अनुज्ञप्ति शुल्काचा ठराविक दर (रुपये दरमहा) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | रुपये | | | |
| १ | ७५०–१,२०० | एक | २२० पर्यंत | ३० |
| २ | १,२०१–२,००० | दोन | २२१–३२० | ६५ |
| ३ | २,००१–२,७०० | तीन | ३२१–४२० | ११० |
| ४ | २,७०१–३,२०० | चार | ४२१–५५० | १४५ |
| ५ | ३,२०१–४,६०० | पाच | ५५१–७५० | २३० |
| ६ | ४,६०१ व त्याहून अधिक | सहा | ७५१–१,११० | ३५० |
| ७ | .... | सात (विशेष प्रकार) | १,१११ व त्याहून अधिक | ३५० |

२. अनुज्ञप्ति शुल्काचे सुधारित दर दिनांक १ सप्टेंबर १९९० पासून अंमलात येतील. दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ ऑगस्ट १९९० या कालावधीतील अनुज्ञप्ति शुल्काची वसुली शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक घभाव. १०८९/४६/सेवा-५, दिनांक २३ मार्च १९८९ मधील आदेशानुसार करण्यात यावी. त्या आदेशानुसार केलेल्या वसुलीमध्ये बदल होणार नाही. दिनांक १ सप्टेंबर १९९० पासूनच्या कालावधीची अतिरिक्त वसुली मासिक वेतन देयकातून ५ हप्त्यांत वसूल करण्यात यावी.

३. काही शासकीय निवासस्थानांना सेवकांसाठी निवासव्यवस्था आणि/अथवा स्वतंत्र वाहनतळ, छप्पर असलेली किंवा छप्पर नसलेली जागा (गॅरेज) जोडलेली असते. शासन असा आदेश देत आहे की, दिनांक १ सप्टेंबर १९९० पासून मुख्य निवासस्थानाच्या धारकाकडून सेवकाच्या निवासव्यवस्थेसाठी व चार चाकी वाहनाच्या वाहनतळासाठीच्या (गॅरेजच्या) अतिरिक्त जागेसाठी खालीलप्रमाणे स्वतंत्र शुल्काची वसुली करण्यात यावी :—

| मुख्य निवासस्थानाबरोबरची अतिरिक्त जागा | शुल्क (रु. दरमहा) |
|---|---|
| (१) सेवकाचे निवासस्थान | ४० |
| (२) स्वतंत्र वाहनतळ (गॅरेज) | ३० |
| (३) वाहनासाठी छप्पर असलेली जागा | २० |
| (४) वाहनासाठी उघडी जागा | १० |

४. वर परिच्छेद १ मध्ये विहित केलेल्या दराने करावयाच्या अनुज्ञप्ति शुल्काच्या वसुलीशिवाय सेवा शुल्काची (Service Charges) स्वतंत्र वसुलीही तशीच चालू ठेवण्यात यावी. शासनाने असेही ठरविले आहे की, दिनांक १ सप्टेंबर १९९० पासून विद्यमान सेवा शुल्क दुप्पट करण्यात यावे. सेवा शुल्काचे दर वाढविल्यामुळे निघणारी वसुली मासिक वेतन देयकातून पाच हप्त्यांत वसूल केली जावी. प्रत्येक निवासस्थानासाठी किंवा निवासस्थानांच्या समुहांसाठी सेवा शुल्काचे सुधारित दर दर्शविणारे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्वतंत्रपणे निर्गमित केले जात आहेत.

५. वर (२) येथे निर्देशिलेला शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सीपीओ. १४७८/सीआर/३२७/सेवा-५, दिनांक १७ एप्रिल १९७८ मधील परिच्छेद ३ निष्प्रभावित करून शासन असाही आदेश देत आहे की, सेवा शुल्काच्या माफीसाठी असलेली वित्तलब्धीवरील रु. ४७५ ची विद्यमान मर्यादा सुधारित वेतनश्रेणीत रु. १,४५० इतकी वाढविण्यात यावी.

६. वर (१) येथे निर्देशिलेल्या शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर. १२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९८८ मधील परिच्छेद ५ मध्ये अंशतः बदल करून शासन असाही आदेश देत आहे की, भाडेमाफ निवासस्थानाच्या बदल्यात द्यावयाची घरभाडे भत्त्याची रक्कम, सर्वसाधारणपणे देय होऊ शकणारा घरभाडे भत्ता अधिक वेतनाच्या आधारे ज्या प्रकारचे निवासस्थान मिळण्यास संबंधित कर्मचारी पात्र असेल त्या प्रकारच्या निवासस्थानासाठी आकारण्यात येणारे अनुज्ञप्ति शुल्क ह्याच्या आधारे निश्चित केली जाईल.

७. मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील ह्यासंबंधातील सध्याच्या तरतुदी या आदेशाच्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आल्या आहेत असे समजले जावे. या नियमांना औपचारिक सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

८. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मंगला मं. कोरगावकर,**
शासनाच्या उप सचिव.

[illegible]